मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी विकास विभाग
क्र.वि.वि/४४/२०१९

डॉ. सुनिल पाटील
प्र. संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०
दुरध्वनी ः२२०४२८५९.

परिपत्रक ः

**विषय**:— शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ''वैद्यकीय गट विमा'' (Group Health Insurance Policy) योजना दि. ८ फेब्रुवारी, २०१९ पासून लागू करून त्या अनुषगांने उर्वरित रक्कम मासिक वेतनातून कपात करणेबाबत....

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्रभारी संचालक, विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्राचे, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की—

मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ''वैद्यकीय गट विमा'' (Group Health Insurance Policy) योजना दि. १८ जुलै, २०१४ पासून कार्यरत होती. परंतु माहे सप्टेंबर, २०१८ रोजी न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनीचा वैद्यकीय गट विमा योजनेचा (Group Health Insurance Policy) कालावधी संपुष्टात आल्याने सदर योजना पुनकार्यान्वित करण्यासाठी आस्थापना विभागामार्फत ई—टेंडरींगकरिता दि. २९ ऑक्टोबर, २०१८ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने एकाही विमा कंपनीकडून निविदा प्राप्त झाली नाही. तद्नंतर दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी संपन्न झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावानुसार ई—टेंडरींगच्या जाहिरातीस दिनांक १३ नोव्हेंबर २०१८ ते २० नोव्हेंबर, २०१८ या कालावधीसाठी **प्रथम व** दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी **द्वितीय मुदतवाढ देण्यात आली.** परंतु सदर मुदतवाढीसही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत ''वैद्यकीय गट विमा योजना'' लागू करण्यासाठी खालील ठराव पारित करण्यात आला.

> "ई—टेंडरींगकरिता सार्वजनिक क्षेत्रातील कोणतीही कंपनी वैद्यकिय विमा कंपनी न आल्याने खाजगी कंपनीकडून निविदा मागविण्यात याव्यात. तसेच मध्यस्थीमार्फतही निविदा मागविण्यात याव्यात. याकरिता कुलसचिव प्रा. (डॉ.) सुनिल भिरूड यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, विद्यार्थी विकास विभाग व विद्यापीठ कर्मचारी संघ प्रतिनिधी या समितीच्या अधिपत्याखाली निर्णय करून ''गट विमा योजना'' पुर्नकार्यान्वित करण्यांत यावी"

मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार कुलसचिव (प्रभारी), यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता **मे. अपोलो म्युनिक हेल्थ ईन्शुरन्स कंपनीची** 'वैद्यकीय गट विमा'' (Group Health Insurance Policy) योजना रू. ३,००,०००/— (रूपये तीन लाख) करिता सुरू करण्यासाठी शिफारशीचा अहवाल सादर केला होता. सदर अहवाल मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २९ जानेवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत **बाब क्र. २०** अन्वये मान्य करून **मे. अपोलो म्युनिक हेल्थ ईन्शुरन्स कंपनीकडून** रू. ३,००,०००/— (रूपये तीन लाख) ''वैद्यकीय गट विमा'' सुरू करण्यास व यापुढेही वार्षिक स्वरूपात निरंतर सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

...२/—

"वैद्यकीय गट विमा" (Group Health Insurance Policy) लागू करण्यासाठी वित्तीय वर्ष २०१८–२०१९ करिता विमा कंपनीस विम्याच्या हप्त्यापोटी अदा केलेली उर्वरित रक्कम शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातुन रू. ३२०/– (तीनशे वीस मात्र) **माहे मार्च, २०१९ पासून** कपात करण्यात येणार आहे, याची नोंद घेण्यात यावी.

सर्व कर्मचा–यांना सुचित करण्यात येते की वैद्यकीय गट विमा योजने संदर्भात काही अडचणी असल्यास विद्यार्थी विकास विभागाचे कर्मचारी **श्री. मंगेश एकनाथ जाधव यांच्याशी (भ्रमणध्वनी क्र. ८२८६५९३९२६/९२२४२६१५०२ किंवा कार्यालयीन दुरध्वनी क्र. २२०४२८५९)** संपर्क साधावा.

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक, विभागप्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मूल्यांकन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांनी सदर बाब संबंधित अधिकारी/कर्मचा–यांच्या निदर्शनास आणावी.

मुंबई–४०००३२
मार्च, २०१९

**(डॉ. सुनिल पाटील)**
**प्र. संचालक**

क्र. वि.वि.वि./ /२०१९

मार्च, २०१९

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक,

संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या
कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:–

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी
७. सर्व सहायक सुरक्षा अधिकारी
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख
९. उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग
१०. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र–कुलगुरू, (३) कुलसचिव, (४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, (५) वित्त व लेखा अधिकारी,

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:–

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ,
३. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.

**(डॉ. सुनिल पाटील)**
**प्र. संचालक**